महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/175 दिनांक : 17 फेबुवारी, 2021

---

**वाचा** :- 1. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/638 दि. 25.06.2020.

2. महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-8220/प्र.क्र. 211/सां.का.4 दि. 05 नोव्हेंबर, 2020.

3. साथरोग कायदा, 1897.

4. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 .

---

## : : आदेश : :

ज्याअर्थी, साथरोग अधिनियम, 1897 च्या खंड 2 नुसार राज्याला मिळालेल्या अधिकारानुसार, महाराष्ट्र राज्यात साथरोग अधिनियमातील खंड 2, 3 व 4 ची अंमलबजावणी करण्याकरिता क्र. कोरोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य-5, दिनांक 13 मार्च, 2020 अन्वये अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुने (कोव्हीड-19) उद्भवणा-या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी महाराष्ट्र कोव्हीड-19, उपाययोजना नियम 2020 यातील नियम 3 नुसार जिल्हाधिकारी यांना यासंदर्भात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे व त्यांना कार्यक्षेत्रातील कोव्हीड-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या कारणासाठी ते सक्षम असतील असे जाहीर केले आहे.

आणि ज्याअर्थी, या नियमाच्या नियम 10 अन्वये जिल्हाधिकारी यांना (कोव्हीड-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र. 1 अन्वये चंद्रपूर जिल्हा सिमेत कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता लॉकडाऊन दरम्यान गर्दी टाळण्याच्या दृष्टीने केवळ 50 लोकांच्या मर्यादेत सामाजिक अंतर (Social Distancing) पाळून खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय/हॉल/सभागृह येथे लग्न समारंभ पार पाडण्यास कोव्हीड-19 संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करुन अटीवर लग्न समारंभ पार पाडण्यास परवानगी देण्यात आली होती व तसे संबंधित उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांना परवानगी देण्याकरिता अधिकार प्रत्यायोजित करण्यात आले होते.

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र. 2 अन्वये शासन निर्णयानुसार इतर सांस्कृतिक कार्यक्रम सुरु करणे संदर्भात परिशिष्ट-अ, भाग – 1 मध्ये बंदिस्त सभागृहाच्या एकूण बैठक क्षमतेच्या 50 टक्के इतक्या मर्यादेपेक्षा प्रेक्षक संख्या जास्त असु नये तसेच भाग -2 नुसार मोकळया जागेत आयोजित होणा-या कार्यक्रमाबाबत 6-6 फुटांवर खुणा करुन त्यानुसार यथास्थिती लोक बसण्याची/उभे राहण्याची व्यवस्था करणे संदर्भात नमूद आहे.

आणि ज्याअर्थी, सद्यास्थितीत चंद्रपूर जिल्हा अंतर्गत कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव बघता कोरोना विषाणूचा संसर्ग दिवसें-दिवस वाढत असल्यामुळे समारंभासाठी गर्दी टाळण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, चंद्रपूर जिल्हा हद्दीतील लग्न व इतर तत्सम कार्यक्रमासाठी असलेली 50 व्यक्तींची मर्यादा कायम ठेवण्यात येवून नाटक व सिनेमा या व्यतिरिक्त होणा-या इतर सभा, बैठका, सामुहिक समारंभ व इतर सांस्कृतिक कार्यक्रम, संबंधित बंदिस्त सभागृहाचे / मोकळया जागेच्या क्षमतेच्या 25 टक्के अथवा 100 व्यक्ती यापैकी जे कमी असेल त्या क्षमतेने लोकांच्या उपस्थितीत शासनाने तसेच या कार्यालयाव्दारा वेळोवेळी जाहिर करण्यात येणा-या कोव्हीड विषयक नियमांचे पालन करण्याचे अटीवर साजरे / संपन्न करता येतील. **तथापि, असे कार्यक्रम ज्या ठिकाणी संपन्न होतील त्याचे मालकांनी / व्यवस्थापकांनी सदर कार्यक्रमाची पूर्व परवानगी संबंधित क्षेत्राचे पोलीस ठाणे प्रमुख यांचेकडून घेणे बंधनकारक राहील. संबंधित पोलीस ठाणे प्रमुख यांनी सदर कार्यक्रमस्थळी एक पोलीस शिपाई यांची मास्क व सामाजिक अंतर पाळण्याची अंमलबजावणी करण्याकरिता नेमणूक करावी.**

उक्त निर्देशांचे उल्लंघन केल्यास साथरोग अधिनियम 1897 व आपत्ती व्यवस्थान कायदा 2005 मधील तरतूदी अन्वये संबंधित सभागृह/मंगल कार्यालय / लॉन / जागा यांचे मालक / व्यवस्थापक यांचेवर पहिल्या चुकीसाठी / उल्लंघनासाठी पहिला दंड रु. 5,000/- , दुसरा दंड रु. 10,000/- व तिसरा दंड रु. 20,000/- याप्रमाणे दंड आकारण्यात येईल तसेच याव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार सदर सभागृह/मंगल कार्यालय/जागा सिल करणे, गुन्हा दाखल करणे यासाठी कारवाई सुध्दा होण्यास सर्व संबंधित पात्र राहतील. तसेच कार्यक्रमाचे आयोजक हे सुध्दा सदर उल्लंघनासाठी रु. 10,000 /- इतक्या दंडास पात्र राहतील.

सदर कारवाई करण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्याचे कर्मचारी/अधिकारी, संबंधाचे स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी/कर्मचारी तसेच महसूल विभागाचे अधिकारी/कर्मचारी सक्षम राहतील.

स्वा/-

(अजय गुल्हाने)

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**प्रतिलीपी** :- **माहितीस सविनय सादर.**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मदत व पुनर्वसन, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-032
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.**

4. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
6. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर. सदर आदेशास व्यापक प्रसिध्दी द्यावी
8. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
9. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
10. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
11. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय चंद्रपूर

17/2/21

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**